**<u>ठळक बातम्या</u>**

- भारतात विमानतळ परिसरात शहर वसवण्याची संकल्पना सर्वप्रथम नागपूर शहरात विकसित होईल, असा केंद्रीय नागरी हवाई वाहतूक मंत्र्यांना विश्वास

- महाराष्ट्रात गौणखनिज आणि वाळू तस्करी रोखण्यासाठी विशेष कृती दल स्थापन करण्याची महसूल मंत्र्यांची घोषणा

- डिजिटल अटक प्रकरणी सीबीआयचे १६ राज्यांमधल्या ८०पेक्षा जास्त ठिकाणांवर छापे

- व्हेनेझुएलामध्ये शक्तिशाली भूकंपाचे धक्के/ ३२ जणांचा मृत्यू, ७०० जखमी

**आणि**

- अमेरिकन खुल्या बॅडमिंटन स्पर्धेत भारतीय खेळाडूंची सर्व गटांमध्ये आगेकूच

**<><><><>**

भारतात विमानतळ परिसरात शहर वसवण्याची संकल्पना सर्वप्रथम नागपूर शहरात विकसित होईल, असं केंद्रीय नागरी हवाई वाहतूक मंत्री किंजरापू राममोहन नायडू म्हणाले. नागपूर विमान वाहतूक क्षेत्राच्या माध्यमातून विदर्भातील औद्योगिक क्षेत्रासह कृषी क्षेत्रातली निर्यात वाढवण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय विमानतळ नागपूरच्या जी एम आर या कंपनीकडे हस्तांतरित करण्याचा कार्यक्रम झाला, त्यावेळी ते बोलत होते. विदर्भात साडे सात लाख कोटी रुपयांची व्यावसायिक गुंतवणूक होत असून त्यासाठी लागणाऱ्या पायाभूत सुविधा उपलब्ध झाल्या तर विदर्भाचा विकास वेगाने होईल, असं प्रतिपादन केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी यावेळी केलं. हे आंतरराष्ट्रीय विमानतळ नागपूर, विदर्भासह मध्य भारताच्या आर्थिक विकासाचं इंजिन बनेल, असा विश्वास महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी व्यक्त केला.

**<><><><>**

हब अँड स्पोक मॉडेलवर आधारित देशातल्या पहिल्या विमानसेवेचं उद्घाटन नागरी विमान वाहतूक मंत्री के. राममोहन नायडू यांनी आज उत्तरप्रदेशात वाराणसी इथल्या लालबहादूर शास्त्री आंतरराष्ट्रीय विमानतळावरून केलं. या विमानसेवेमुळे आता वाराणसीहून दिल्ली मार्गे

थेट जगभरात कुठेही जाता येता येणार आहे. या हब अँड स्पोक मॉडेलमुळे विमान प्रवासात मोठा बदल घडून येणार असल्याचं राममोहन नायडू यावेळी म्हणाले. हब अँड स्पोक प्रकारात देशातल्या एखाद्या छोट्या भागातल्या विमानतळावरून जगभरातल्या कोणत्याही मोठ्या शहरातल्या विमानतळाकडे थेट प्रवास करता येतो, या मॉडेलची अंमलबजावणी भारतात केल्यामुळे नागरिकांना आपल्या प्रदेशातूनच आंतरराष्ट्रीय प्रवासाला जाता येईल, असं नायडू यांनी सांगितलं.

**<><><><><>**

महाराष्ट्रात गौणखनिज माफिया आणि वाळू तस्करी रोखण्यासाठी विशेष कृती दल स्थापन करण्याची घोषणा महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी विधानसभेत प्रश्नोत्तराच्या तासात केली. गडचिरोली जिल्ह्यात नायब तहसीलदारावर झालेल्या हल्ल्या संदर्भातल्या प्रश्नावर ते उत्तर देत होते.

राज्यात गेल्या पाच वर्षांत दस्त नोंदवण्यासाठी मुद्रांकशुल्क निश्चिती करण्यात आलेल्या सर्व प्रकरणांची तपासणी महालेखापरीक्षकांमार्फत करण्याची घोषणाही महसूल मंत्र्यांनी केली. दस्त नोंदणी करण्यासाठी मुद्रांक शुल्क निश्चित करण्याचे अधिकार असणाऱ्यांनी मुद्रांक शुल्क निश्चित करताना संबंधित कायद्याचं उल्लंघन करून ते मनमानी पद्धतीने कमी जास्त केल्याच्या तक्रारी आहेत यामुळे हा निर्णय घेण्यात आला आहे असं बावनकुळे म्हणाले.

कोकणातल्या आंबा आणि काजू उत्पादक शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्यासाठी NDRF च्या निकषांच्या पलीकडे जाऊन मदत देण्याची सरकारची तयारी असल्याचं मंत्री नितेश राणे यांनी आज विधानसभेत प्रश्नोत्तराच्या तासात सांगितलं. तर कोकणात अवकाळी पावसानं साडे २२ हजार हेक्टरवरील पिकांचं नुकसान झालं असून या शेतकऱ्यांना ८-१० दिवसात NDRF च्या निकषानुसार २०९ कोटी रुपयांची मदत देऊ अशी माहिती कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिली. कोकणातल्या सुमारे ७२ हजार शेतकऱ्यांना पीक विम्याचे २१७ कोटी रुपये येत्या १५ दिवसांत दिले जातील, असं आश्वासन देखील कृषिमंत्र्यांनी दिलं.

ही मदत तुटपुंजी असल्याचा आक्षेप आमदार निलेश राणे यांनी घेतला.

**<><><><><>**

मालवाहतूक करणाऱ्या वाहनांमधून प्रवासी वाहतूक करणाऱ्या वाहतूकदारांचे परवाने रद्द करायचा निर्णय राज्य सरकारने घेतला असून अधिकाऱ्यांना तशा सूचना दिल्या आहेत, अशी घोषणा परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी आज विधानपरिषदेत केली. रस्ते अपघात टाळण्यासाठी एक सर्वसमावेशक सुरक्षाविषयक आराखडा तयार करायचं काम परिवहन विभागाने हाती घेतलं असून अपघातप्रवण ठिकाणी काय उपाययोजना करता येतील, याचा आढावा घेतला जात आहे. लवकरात लवकर तो पूर्ण करून केंद्र आणि राज्य सरकारच्या मदतीने त्याची अंमलबजावणी केली जाईल, असं आश्वासन त्यांनी एका प्रश्नाच्या उत्तरात दिलं.

**<><><><><>**

केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्री पीयूष गोयल आजपासून तीन दिवस ब्रिटनच्या दौऱ्यावर जात आहेत. भारत आणि ब्रिटनमध्ये होत असलेल्या आर्थिक आणि व्यापार कराराच्या पार्श्वभूमीवर हा दौरा होत आहे. या भेटीदरम्यान गोयल युकेचे वाणिज्य आणि व्यापार मंत्री पीटर कोइल यांच्याशी उच्चस्तरीय द्विपक्षीय चर्चा करणार आहेत. व्यापार कराराच्या अंमलबाजावणीच्या तयारीवर या चर्चेत भर असेल.

**<><><><><>**

आज संविधान हत्या दिवस पाळला जात आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आणीबाणीचा विरोध करणाऱ्या मान्यवरांना वंदन केलं आहे. आणीबाणीच्या काळात भारतीय नागरिकांचं धैर्य दिसून आलं, आजही भारत न्याय, स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या तत्वांशी बांधील असल्याचं प्रधानमंत्र्यांनी समाजमाध्यमावर म्हटलं आहे.

१९७५ मध्ये आजच्या दिवशी देशात आणीबाणी लागू करण्यात आली होती. त्या घटनेचं स्मरण म्हणून आजचा दिवस पाळला जात आहे. आणीबाणीच्या काळात देशासाठी प्राण गमावलेल्या व्यक्तींना श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी तसंच संविधानाचं आणि लोकशाहीचं मूल्य नागारिकांना समजावं यासाठी आज देशभरात आज विविध कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे.

**<><><><><>**

डिजिटल अटक या सायबर गुन्हे प्रकाराच्या २०० हून अधिक प्रकरणात तपास करताना सीबीआय अर्थात केंद्रीय गुप्तचर संस्थेनं महाराष्ट्र, गुजरात, पंजाब आणि दिल्लीसह

१६ राज्यांमधल्या ८०पेक्षा जास्त ठिकाणांवर छापे टाकले. तसंच, चेन्नई आणि कोलकाता इथून दोन जणांना अटक केली आहे. देशभरात डिजिटल अटक घोटाळ्याच्या २०० पेक्षा जास्त प्रकरणांमध्ये सहभाग असलेल्या गुन्हेगारी जाळ्याविरुद्ध ऑपरेशन चक्र ६ अंतर्गत सीबीआय तपास करत आहे. अटक करण्यात आलेले आरोपी शेल कंपन्या स्थापन करून बनावट बँक खाती तयार करत होते. सायबर अटकेतून मिळालेली रक्कम या खात्यांमध्ये वळवण्यात येत होती. अशा प्रकारचे सायबर गुन्हे करणाऱ्या जाळ्याला मोडून काढणं हा ऑपरेशन चक्रचा उद्देश असल्याचं सीबीआयने म्हटलं आहे.

**<><><><>**

अयोध्येच्या श्रीरामजन्मभूमी तीर्थ क्षेत्र न्यासाला मिळालेल्या देणग्यांचा अपहार झाल्याचा आरोप करणाऱ्या आणि याप्रकरणी चौकशीचे आदेश द्यावे अशी मागणी करणाऱ्या याचिकेची तातडीनं सुनावणी घ्यायला सर्वोच्च न्यायालायानं आज नकार दिला. मात्र येत्या सोमवारी क्रमानुसार याचिका सादर करावी असं न्यायमूर्ती बी.व्ही नागरत्ना आणि न्यायमूर्ती जॉयमाल्य बागची यांनी सांगितलं. न्यासाला मिळालेल्या देणग्यांसंदर्भात सीसीटीव्ही फूटेज, डिजिटल पेमेंटच्या नोंदी, आणि इतर सर्व प्रकारचे पुरावे जतन करावे अशी मागणी याचिकाकर्ते वकील नरेंद्र कुमार गोस्वामी यांनी केली आहे. धार्मिक बाबींशी काही देणं घेणं नसून केवळ प्रशासकीय कारभाराबाबत आपली मागणी असल्याचं याचिकेत स्पष्ट केलं आहे.

दरम्यान, या प्रकरणी उत्तर प्रदेश सरकारने नेमलेल्या त्रिसदस्यीय विशेष तपास पथकानं अलिकडेच प्राथमिक अहवाल राज्यसरकारला सादर केला असून सविस्तर तपास सुरु आहे.

**<><><><>**

व्हेनेझुएलामध्ये याराकुय राज्यातल्या युमारे शहरात आज सकाळी भूकंपाचा मोठा धक्का बसला. याची तीव्रता साडेसात रिख्टर स्केल होती, तसंच सॅन फेलिप इथंही ७पूर्णांक २दशांश तीव्रतेचा भूकंपाचा धक्का जाणवल्याचं 'यूएस जिओलॉजिकल सर्व्हे'नं म्हटलं आहे. या भूकंपात कॅराकास आणि परिसरात अनेक इमारती कोसळून किमान ३२ जणांचा मृत्यू झाला, तर ७०० हून अधिक जखमी झाले. भूकंपग्रस्त भागात मदत आणि बचाव कार्य सुरु आहे. व्हेनेझुएलाच्या अध्यक्ष डेल्सी रॉडरीग्ज यांनी राष्ट्रीय आणीबाणी घोषित केली आहे.

उपराष्ट्रपती सी पी राधाकृष्णन् आणि प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी या दुर्घटनेबद्दल तीव्र दुःख व्यक्त केलं आहे. संकटाच्या या काळात भारत व्हेनेझुएलाच्या पाठीशी असल्याचं दोन्ही नेत्यांनी सांत्वनपर संदेशात म्हटलं आहे.

जपानच्या उत्तरेकडील भागातही आज सकाळी ६ पूर्णांक ९ दशांश रिख्टर तीव्रतेचा भूकंप झाला. टोकियोमध्येही भूकंपाचे सौम्य धक्के जाणवले. मात्र, त्सुनामीचा कोणताही इशारा देण्यात आलेला नाही आणि यात कोणतीही जीवितहानी झाल्याचं वृत्त नाही.

दरम्यान, या भूकंपाच्या पार्श्वभूमीवर जपानच्या प्रधानमंत्री कार्यालयाने विशेष कृती दलाची स्थापना केली आहे.

**<><><><><>**

अमेरिकेत फुलरटन इथे सुरु असलेल्या अमेरिकन खुल्या बॅडमिंटन स्पर्धेत भारताने सर्व गटांमध्ये मोठी आघाडी घेतली आहे. जागतिक कनिष्ठ अजिंक्यपद स्पर्धेतली रौप्यपदकविजेती भारताची तन्वी शर्मा हिने  महिला एकेरी गटात जर्मनीच्या युवोन ली हिचा पराभव करून दुसऱ्या फेरीत प्रवेश केला आहे. भारताच्या रक्षिता श्री हिनेही चेक प्रजासत्ताकाच्या टेरेझा स्वाबिकोवा हिचा पराभव करत पुढच्या फेरीत प्रवेश केला आहे. जागतिक स्तरावर पाचवा मानांकित भारताच्या किदम्बी श्रीकांतने  पुरुष एकेरी गटात भारताच्याच डी सानित चा पराभव केला, तर रौनक चौहान याने कनिष्ठ अजिंक्यपद स्पर्धेतील माजी रौप्यपदक विजेता भारताचाच एस शंकर मुथुस्वामी याचा पराभव केला आहे. मिश्र दुहेरी गटात भारताच्या ध्रुव रावत आणि के मनीषा या जोडीने इंडोनेशियाच्या जोडीचा पराभव केला आहे.

**//<><><><><>//**